# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (शिक्षण विभाग)

जा.क्र. 228/शि.वि./२०१५ दि०2 /02/2015

**प्रती,**

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ/उच्च प्राथ. व माध्य. शाळा, म.न.पा. नागपूर.

**विषय : शाळा व शालेय परिसर स्वच्छतेबाबत.**

उपरोक्त विषयान्वये सुचित करण्यात येते की, मा.शिक्षण सभापती, मा.आयुक्त, मा.अपर आयुक्त व मा.उपायुक्त यांनी दिलेल्या शाळा भेटींदरम्यान शाळेमध्ये व शालेय परिसरामध्ये स्वच्छतेचा अभाव बऱ्याच शाळांमध्ये आढळून आला. शाळा हे विद्येचे मंदिर असून विद्यार्थी तेथे शिक्षणरुपी ज्ञानार्जन करायला येतात. अशा शिक्षण मंदिराची स्वच्छता राखणे हे अत्यंत गरजेचे असून शाळेमध्ये व शालेय परिसरामध्ये अस्वच्छता राहील्यास त्याचा एकुण परिणाम शालेय वातावरणावर व विद्यार्थ्यांच्या शारिरीक व मानसिक आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. यासोबचत प्रसार माध्यमांमध्येसुध्दा म.न.पा. शाळांमध्ये आढळणाऱ्या गैरसोई व अस्वच्छता यांचे वारंवार चित्रण करुन या शाळांची नकारात्मक बाजु वारंवार अधोरेखित केली जाते. हे चित्र शाळांसाठी, शिक्षकांसाठी व पर्यायाने प्रशासनासाठी निश्चितच चांगले नसून हे बदलविण्याची अत्यंत गरज आहे.

यामुळे आपणांस निर्देशित करण्यात येते की, आपल्या शाळेमध्ये असणाऱ्या सर्व शिक्षकांना सामुहीकरित्या शाळा व शालेय परिसराची स्वच्छता, सफाईकामगार/चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांचेकडून होते किंवा नाही, याबाबतची जबाबदारी सोपविण्यात यावी. हे करीत असतांना आपल्या शाळेमध्ये असणाऱ्या एकुण शिक्षकांमध्ये महिन्यांच्या दिवसाची विभागणी करुन प्रत्येक शिक्षकावर महिन्यातील ठरावीक कालावधीकरीता (समानरित्या) स्वच्छतेबाबतची जबाबदारी सोपविण्यात यावी. कार्य सोपविण्यात आलेल्या शिक्षकावर त्या कालावधीत चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्याकडून / सफाई कामगाराकडून स्वच्छतेचे कार्य करवून घेण्याची संपूर्ण जबाबदारी राहील. स्तुत परिपत्रक प्राप्त झाल्यानंतर आपणं आपल्या स्तरावर याबाबतचे नियोजन करुन शिक्षक निहाय/दिवसनिहाय वेळापत्रक तयार करुन ते आपले कक्षात/स्टाफ रुम मध्ये लावावे. जेणेकरुन शाळेमध्ये शिक्षणाधिकारी/उपायुक्त व इतर प्रशासकीय अधिकाऱ्यांची भेट झाल्यास वेळापत्रकाव्दारे तात्काळ जबाबदारी देण्यात आलेल्या शिक्षकाबाबत माहिती कळणे सुलभ होईल.

तसेच या परिपत्रकाव्दारे आपणांस सुचित करण्यात येत की, परिपत्रक प्राप्त झाल्यानंतर लगेच यामध्ये दिलेल्या सुचनांची अंमलबजावणी करणे सुरु करावे. अंमलबजावणी करीत असतांना काही अडचणी असल्यास जसे, आपल्या शाळेत सफाई कर्मी/ चतुर्थ श्रेणी कर्मचारी उपलब्ध नसल्यास, उपलब्ध असूनही कामात टाळाटाळ/हयगय करीत असल्यास, विनाईतल्ला सतत गैरहजर राहात असल्यास, शाळेतील शिक्षक जबाबदारी घेण्यास नाकारत असल्यास, या सर्व बाबी तात्काळ विभागास कळविण्यात याव्यात. जेणेकरुन आपल्या त्रृट्या दुर करण्याची कार्यवाही करता येईल.

फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून मा.उपायुक्त या शाळांना प्रत्यक्ष भेटी देऊन पाहणी करणार आहेत. मा.उपायुक्त यांनी निर्देशित केले आहे की, त्यांचे भेटीत अस्वच्छता आढळल्यास भेट दिलेल्या दिवशी ज्या शिक्षकावर स्वच्छता करवून घेण्याची जबाबदारी दिलेली आहे, त्यांना दोषी मानून कारवाई करण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घेऊन याबाबत आपल्या अधिनस्थ शिक्षक व कर्मचाऱ्यांना अवगत करावे.

**शिक्षणाधिकारी**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**

**प्रतिलिपी,**

1. मा.उपायुक्त(I), म.न.पा., नागपूर
2. सहा.शिक्षणाधिकारी, म.न.पा., नागपूर
3. सर्व शाळा निरीक्षक, झोन क्र.1ते10, म.न.पा., नागपूर

PC:3/C:/SRW/letter.doc